# मेट्रो-३ स्थानकांतील स्वच्छतागृहात बाळाचे डायपर बदलण्याची सोय

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या वतीने कुलाबा-वांद्रे-सीप्झ या भुयारी मेट्रो ३ चे काम सुरू असून या मार्गावरील २६ स्थानकांमध्ये उभारण्यात येणाऱ्या महिला व पुरुष स्वच्छतागृहात बाळाचे डायपर बदलण्याची सुविधा असणार आहे. पुरुष स्वच्छतागृहात बाळाचे डायपर बदलण्याची सुविधा करून देणारे मेट्रो ३ हे देशातील पहिले कॉर्पोरेशन असेल, असा दावाही या सुविधेच्या निमित्ताने करण्यात आला आहे.

मुंबई मेट्रो ३ मध्ये प्रथमच स्थानकातील पुरुषांच्या स्वच्छतागृहात लहान मुलांच्या डायपर चेंजिंगची सुविधा उपलब्ध केली जाणार आहे. देशात प्रथमच मेट्रो स्थानकाच्या आवारात अशा पद्धतीची सुविधा उपलब्ध करण्यात येत आहे. आतापर्यंत भारतातील कोणत्याही मेट्रो स्थानकावर मुलांच्या डायपर चेंजिंगची सुविधा पुरुषांच्या स्वच्छतागृहात नाही. मेट्रो ३ मधील कफ परेड ते सीप्झपर्यंतच्या सर्व २६ स्थानकांवर ही सुविधा असणार आहे. सर्व स्थानकांवर तिकीट काऊंटरच्या आतील भागात ही स्वच्छतागृहे असून केवळ सांताक्रूझ स्थानकावर हे स्वच्छतागृह तिकीट काऊंटरच्या बाहेरील बाजूस असणार आहे.

प्रत्येक स्थानकावर महिला व पुरुषांसाठी प्रत्येकी एक स्वच्छतागृह असणार आहे. स्थानकातील जागेच्या उपलब्धतेनुसार स्वच्छतागृहांची मांडणी व रचना करण्यात आली आहे, अशी माहिती मेट्रो ३ कडून देण्यात आली.